वि.बाल संरक्षण खं.क्र.२३/२०२५

सरकार वि. शरद वगैर

**आदेश नि.१७ वर**

१. अर्जदाराने हा अर्ज पोलीस स्टेशन अनसिंग येथील अपराध क्र. २६/२०२५ कलम ७४, ७८,३(५)भा.न्या.सं. ८ व १२ बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम २०१२ नुसार या गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेली पलसर १२५ डिटीएसआय दुचाकी मोटार सायकल क्र.एम.एच.३७—ए.सी—९९०८ ही सुप्रतनाम्यावर मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे म्हणणे आहे की, तो जप्त केलेल्या मोटार सायकलचा मालक आहे, त्याला दैंनदिन कामाकरिता मोआर सायकलची आवश्यकता आहे. जप्त केलेली मोटार सायकल ही पोलीस स्टेशनच्या आवारात उघडयावर ठेवलेली आहे आणि म्हणुन मोटार सायकलची नुकसान होण्याची शक्यता आहे. वरील सर्व कारणावरून अर्जदाराने त्याची मोटार सायकल सुप्रतनाम्यावर देण्याची मागणी केलेली आहे.?

३. तपासी अंमलदार यांचे म्हणणे नोदविंले. तपासी अंमलदाराने जप्त केलेली मोटार सायकल अर्जदारास सुप्रतनाम्यावर देण्यास हरकत दर्शविली आहे.

४. अर्जदाराने सदर वाहनाचे बिल,रजिस्टेशनची प्रत, इन्शुरन्सची प्रत व आधार कार्डची प्रत दाखल केलेली आहे. मुळप्रतीवरून वरील दस्तऐवज तपासुन पाहीले त्यावरून अर्जदार करण आकाश इंगोले हा जप्त केलेल्या पलसर १२५ डिटीएसआय दुचाकी मोटार सायकल क्र.एम.एच.३७—ए.सी—९९०८ चा मालक दिसुन येत आहे. जप्त केलेली मोटार सायकल हिची (५)तपासकामी आवश्यकता पडल्यास हजर करण्याच्या अटींवर जप्त केलेली मोटार सायकल अर्जदारास सुप्रतनाम्यावर देण्याचा आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. जप्त केलेली पलसर १२५ डिटीएसआय दुचाकी मोटार सायकल क्र.एम.एच.३७–ए.सी–९९०८ ही अर्जदारास १,२५,०००/– च्या सुप्रतनाम्यावर देण्यात येत आहे. अर्जदारानेया प्रकरणाचा निकाल लागेपर्यत सदरची मोटार सायकलीची कोणत्याही प्रकारे विल्लेवाट लावू नये व न्यायालयाने ती मागणी केल्यानंतर ताबडतोब न्यायालयात हजर करावी. तसेच सदर सुप्रतनाम्याचे सर्व कागदपत्रे गुन्हा क्र.२६/२०२५ च्या सोबत जोडण्यात यावे.

२. संबंधीत वाहन पोलीस स्टेशन अनसिंग यांनी उपरोक्त अटी व शर्तीचे बंधपत्र अर्जदाराकडून लिहून घेवून सदरचे वाहन तात्पुरत्या स्वरूपात अर्जदाराच्या ताब्यात दयावे.

JAIN CHANDRAKALA PARASMAL

Digitally signed by JAIN CHANDRAKALA PARASMAL
Date: 2025.05.08 10:43:27 +0530

वाशिम
दि.५/५/२०२५

(सी. पी. जैन)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१
वाशिम.

Certificate.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original order.

Name of the Stenographer :- R.M.Rajurkar, Stenographer (Grade - 1)
Court Name :-Ad Hoc District Judge –1 and A.S.J. Washim

Date :- 05.05.2025
Order signed by the Presiding Officer on :- 06.05.2025
Order uploaded on :-07.05.2025